METAL & ENERGY
Trade with Trust

MCX/SEC/2339

February 12, 2024

The Dy. General Manager
**Corporate Relations & Service Dept.**
BSE Limited,
P.J. Towers, Dalal Street,
Mumbai 400001

**Scrip code: 534091, Scrip ID: MCX**

**Subject: Intimation on publication of financial results in the newspapers**

Dear Sir/Madam,

Pursuant to Regulation 47(1)(b) of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, please find enclosed newspaper publication in following mentioned newspapers on Monday, February 12, 2024: Business Standard (English) and Navshakti (Marathi), containing un-audited financial results (Consolidated & Standalone) for the quarter and nine months ended December 31, 2023, as approved by the Board of Directors at their meeting held on Saturday, February 10, 2024.

The same will also be available on the website of the Company at www.mcxindia.com

Kindly take the same on record.

Thanking you,

Yours faithfully,

**For Multi Commodity Exchange of India Limited**

**Manisha Thakur**
**Company Secretary**

*Encl: as above*

MULTI COMMODITY EXCHANGE OF INDIA LTD.
EXCHANGE SQUARE, SUREN ROAD, ANDHERI (EAST), MUMBAI 400 093, INDIA. TEL: +91-22-6731 8888, FAX: +91-22-66494151, www.mcxindia.com
CIN: L51909MH2002PLC135594, info@mcxindia.com

# Govt probing China FDI in Paytm Payments Services

PRESS TRUST OF INDIA
New Delhi, 11 February

The government is examining foreign direct investment (FDI) from China in Paytm Payments Services Ltd (PPSL), the payment aggregator subsidiary of One97 Communications Ltd (OCL), sources said.

In November 2020, PPSL had applied for licence with the Reserve Bank of India (RBI) to operate as a payment aggregator under the Regulation of Payment Aggregators and Payment Gateways. However, in November 2022, RBI rejected PPSL's application and asked the company to resubmit it, so as to comply with Press Note 3 under FDI rules.

One97 Communications Ltd has investment from Chinese firm Ant Group.

Subsequently, the company filed the required application on December 14, 2022 with the Government of India for past downward investment from OCL into the company in order to comply with Press Note 3 prescribed under FDI guidelines. An inter-ministerial committee is examining investments from China in PPSL and decision would be taken on the FDI issue after due consideration and comprehensive examination, sources said.

Under Press Note 3, the government had made its prior approval mandatory for foreign investments in any sector from countries that share land border with India to curb opportunistic takeovers of domestic firms following the Covid-19 pandemic.

When contacted, a Paytm spokesperson said PPSL applied for an online Payment Aggregator (PA) application for online merchants and the regulator subsequently asked PPSL to seek necessary approvals for past downward investment and resubmit the application. "This is part of the regular process where everybody applying for a payment aggregator licence has to get FDI approval," the spokesperson said.

The spokesperson said PPSL followed the relevant guidelines and submitted all relevant documents to the regulator within the stipulated time.

During the pending process, PPSL was allowed to continue with its online payment aggregation business for existing partners without taking onboard any new merchants.

"Since then the ownership structure has changed. The Paytm founder remains the largest stakeholder in the company. Ant Financial reduced its stake in OCL to less than 10 per cent in July 2023. Subsequently, it does not qualify for beneficial company ownership. OCL founding promoter now holds a 24.3 per cent stake. Therefore, your understanding of FDI from China in PPSL is incorrect and misleading," the spokesperson said.

The Reserve Bank last month barred Paytm Payments Bank Ltd (PPBL), an associate company of OCL, from accepting deposits or top-ups in any customer account, prepaid instruments, wallets, and FASTags, among others after February 29, 2024.

## Suppliers apprehensive about scrutiny of Chinese firms: Xiaomi

Chinese electronics major Xiaomi has said that smartphone component suppliers are wary about setting up operations in India amid heavy scrutiny of Chinese firms by the government, according to a letter and a source with direct knowledge of the matter. Xiaomi also asks in the letter dated February 6 that India consider offering manufacturing incentives and lowering import tariffs for certain smartphone components.

The letter is Xiaomi's response to a query from the information technology ministry asking how the government can further develop component manufacturing sector. India ramped up scrutiny of Chinese businesses after a border clash in 2020. In the letter, Xiaomi India President Muralikrishnan B. said India needed to work on "confidence building" measures to encourage component suppliers to setup operations locally. REUTERS

# Paytm gets merchants' backing, assures service continuity without disruption

PRESS TRUST OF INDIA
New Delhi, 11 February

One97 Communications has received support from merchants, and it assured them of continuity of services without any disruption, the company said in a blog on Sunday.

The blog post came amid the recent crisis around Paytm Payments Bank Limited (PPBL), an associate company of Paytm, which has been barred by the RBI from accepting deposits or top-ups in customer accounts, wallets, FASTags and other instruments after February 29.




Withdrawal or utilisation of balances by its customers from their accounts, including savings bank accounts, current accounts, prepaid instruments, FASTags, and National Common Mobility Cards, are to be permitted without any restrictions up to their available balance. "We assure our users and merchant partners that the Paytm app and services continue to operate at full capacity. In instances, where our associate Paytm Payments Bank acts as a back-end bank, we can seamlessly transition these services to other partner banks. This ensures that our merchant partners face no disruptions, no need to revisit existing setups, and no additional effort," the blog said.

Paytm said its merchant partners can continue to benefit from solutions like Paytm QR codes, Soundbox, and card machines, just as before.

Leading firms have expressed their satisfaction with their prolonged association with Paytm, the blog added.

# 'Supply chain isn't a concern'

GFCL EV Products, a wholly owned subsidiary of BSE-listed Gujarat Fluorochemicals Limited (GFL), has announced a ₹6,000 crore investment to ramp up the production capacity of battery materials for electric vehicles. **BIR KAPOOR**, deputy managing director and chief executive officer, GFL, in a video interview with **Nitin Kumar** discusses the company's plans. Edited excerpts:



Q&A
BIR KAPOOR
Deputy managing director & CEO, GFL

**How are the growth prospects of your business?**

Decarbonisation and transition to renewable energy will boost our market. Our ₹6,000 crore investment will enable us to supply around 200 GWh annually of electric vehicle (EV) and energy storage system (ESS) battery solutions.

In the long term, we anticipate having demand from both domestic and export markets, with 60-65 per cent from (the) exports (market) and 40-35 per cent from the domestic market. By 2030, the projected GWh demand in India will be around 250 GWh, whereas global demand will reach 6,000 GWh. So, India as part of global business would be about 5 per cent in GWh branch term. We may have 35 per cent or so of the business coming from this region. This forecast aligns with our projected capacity, likely to be reached by around 2030, following the investment announcements we have made.

**What are the primary raw materials you source for the battery manufacturing process?**


Our philosophy at GFL for all the areas we have ventured into is that we normally prefer backward integration as much as possible. In battery materials, there are two to three raw material streams, the primary being lithium, salts (phosphorus), and fluorspar (fluorine). In fluorspar, we are already backward integrated and have mines in Morocco. Phosphorus supply is already available. For lithium, we are going to have two types of arrangements for the supply chain. One is where OEMs (original equipment manufacturers) have secured lithium supplies and they supply it directly to us, or they pass it through. Regarding potential sources, we have been looking at sources in Argentina, among many other countries.

Today, lithium prices are low, and lithium capacities and mines are already coming up. So, lithium availability will not be a concern. Moreover, auto OEMs ensure that lithium is provided to us.

**How many EV OEMs have signed raw material supply agreements?**

In the automotive supply chain, there is tremendous confidentiality. But to give a perspective, we have engaged with all the big battery manufacturers and automobile manufacturers that one can think of. We are engaged with all the Indian players and a few global players. Agreements happen in various stages, and we have crossed certain hurdles, but because of non-disclosure agreements, I cannot share details.

*More on business-standard.com*




# Apollo Hospitals targets 15% topline growth till '30

Apollo Hospitals Enterprise (AHEL) is expecting a topline growth of over 15 per cent per annum till 2030 and will be increasing its presence in metros and Tier-I cities in India, Krishnan Akhileswaran, chief financial officer (CFO), told *Business Standard*.

The growth will be driven by all three segments, including hospitals, diagnostics, and digital.

"We would continue to grow at over 15 per cent topline as a combination of all three segments. By 2030, we would continue to be the largest player in all three divisions. In the next five years, we will be increasing our opportunities in metros and Tier-I cities in India," Akhileswaran said.

SHINE JACOB






# Multi Commodity Exchange of India Limited

Exchange Square, Suren Road, Andheri (East), Mumbai 400 093, India. | CIN: L51909MH2002PLC135594 | Email id: info@mcxindia.com | www.mcxindia.com

MCX METAL & ENERGY Trade with Trust




## EXTRACT OF UNAUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER AND NINE MONTHS ENDED 31 DECEMBER, 2023

(₹in Lakh, except per share data)

| PARTICULARS | Consolidated | | | | | | Standalone | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Three months ended 31 December, 2023 Unaudited | Three months ended 30 September, 2023 Unaudited | Three months ended 31 December, 2022 Unaudited | Nine months ended 31 December, 2023 Unaudited | Nine months ended 31 December, 2022 Unaudited | Year ended 31 March, 2023 Audited | Three months ended 31 December, 2023 Unaudited | Three months ended 30 September, 2023 Unaudited | Three months ended 31 December, 2022 Unaudited | Nine months ended 31 December, 2023 Unaudited | Nine months ended 31 December, 2022 Unaudited | Year ended 31 March, 2023 Audited |
| 1 Income from Operations | 19,153 | 16,511 | 14,357 | 50,241 | 37,976 | 51,351 | 16,312 | 13,964 | 12,303 | 42,998 | 33,481 | 44,922 |
| 2 Net Profit for the period (before Tax, Exceptional items and Share of Profit of Associate) | (1,327) | (1,642) | 4,848 | (299) | 17,927 | 19,555 | (3,620) | (515) | 4,280 | (1,164) | 15,065 | 17,135 |
| 3 Net Profit for the period before tax (after Exceptional items and Share of Profit of Associate) | (1,441) | (1,744) | 4,778 | (641) | 17,656 | 19,057 | (3,620) | (515) | 4,280 | (1,164) | 15,065 | 17,135 |
| 4 Net Profit for the period after tax | (535) | (1,907) | 3,879 | (476) | 14,352 | 14,897 | (2,714) | (678) | 3,388 | (999) | 11,768 | 12,983 |
| 5 Total Comprehensive Income for the period [Comprising profit for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | (561) | (2,104) | 3,890 | (726) | 14,379 | 14,993 | (2,744) | (928) | 3,366 | (1,259) | 11,656 | 12,914 |
| 6 Equity Share Capital (of ₹ 10/- per share) | 5,099.84 | 5,099.84 | 5,099.84 | 5,099.84 | 5,099.84 | 5,099.84 | 5,099.84 | 5,099.84 | 5,099.84 | 5,099.84 | 5,099.84 | 5,099.84 |
| 7 Reserves (excluding Revaluation reserves as shown in the Audited Balance Sheet) | - | - | - | - | - | 1,42,830 | - | - | - | - | - | 1,54,470 |
| 8 Earnings Per Share (of ₹ 10/- each)* | | | | | | | | | | | | |
| Basic (₹): | (1.05) | (3.74) | 7.62 | (0.93) | 28.20 | 29.27 | (5.32) | (1.33) | 6.66 | (1.96) | 23.12 | 25.51 |
| Diluted (₹) : | (1.05) | (3.74) | 7.62 | (0.93) | 28.20 | 29.27 | (5.32) | (1.33) | 6.66 | (1.96) | 23.12 | 25.51 |

** Earnings per share for the interim period is not annualised.*

**Notes:**

1. The above is an extract of the detailed format of Quarterly Financial Results filed with BSE under Regulation 33 of the SEBI (Listing and Other Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Quarterly Financial Results are available on BSE's website at www.bseindia.com and on the Company's website at www.mcxindia.com.
2. The above results have been reviewed by the Audit Committee and approved by the Board of Directors at their meeting held on February 10, 2024.

*Place: Mumbai | Date: February 10, 2024*

For **Multi Commodity Exchange of India Limited**
sd/-
**P. S. Reddy**
Managing Director & CEO

# छत्रपती शिवाजी महाराज घडण्यामागे समर्थ रामदास

**पुणे :** उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी आळंदीत सुरू असलेल्या गीता- भक्ती अमृत महोत्सवाला रविवारी उपस्थिती दर्शवली. यावेळी स्वामी श्री गोविंददेव गिरी महाराज यांची योगी आदित्यनाथ यांनी प्रशंसा केली. ज्याप्रमाणे समर्थ रामदास स्वामी यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांना घडविण्याचे काम केले, त्याप्रमाणेच श्री गोविंददेव गिरी महाराज आज काम करत आहेत, असे विधान केले. दरम्यान, गोविंददेव गिरी महाराज हे श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टचे कोषाध्यक्ष आहेत.

### योगी आदित्यनाथ यांचे आळंदी येथे विधान



राम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्यात बोलत असताना त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि छत्रपती शिवाजी महाराज यांचे उदाहरण देऊन अनुष्ठानचे महत्त्व समजावून सांगितले होते. त्यांच्या विधानवरून बरीच टीका झाली होती. छत्रपती शिवाजी महाराजांची पंतप्रधानांशी तुलना करण्याचा हा प्रकार असल्याचे विरोधकांनी म्हटले होते. त्यानंतर रविवारी योगी आदित्यनाथ यांनी समर्थ रामदास स्वामी यांच्या कार्याची ओळख गोविंददेव गिरी महाराज यांच्या कामाला दिली आहे.

योगी आदित्यनाथ पुढे म्हणाले, मला आळंदीत येण्याची खूप पूर्वीपासूनची इच्छा होती. मी लहानपणी ज्ञानेश्वरीचे वाचन केले होते. तेव्हापासून मला दिव्यविभूतीचे दर्शन घ्यायचे होते. अवघ्या १५ व्या वर्षी ज्ञानेश्वरीचे लिखाण करून ज्यांनी २१ व्या वर्षी समाधी स्वीकारली, त्या ज्ञानेश्वर माऊलींचे आज मला दर्शन घेता आले.

### काय म्हणाले योगी आदित्यनाथ?

आपल्या भाषणात योगी आदित्यनाथ म्हणाले, "समर्थ रामदास स्वामी यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांना घडविले. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांनी संपूर्ण भारतभर चेतना निर्माण केली. त्या कालखंडात औरंगजेबाच्या सत्तेला आव्हान देत असताना त्यांनी औरंगजेबाला इथे मरण्यासाठी सोडलं. तेव्हापासून आजपर्यंत औरंगजेबाला कुणीही विचारत नाही. ही शौर्य आणि पराक्रमाची धरती आहे, कारण या मातीला पूज्य संतांचे सानिध्य प्राप्त झाले. इथल्या भक्तांनी आपल्या संताना एका उंचीवर नेले आहे. त्यामुळे इथल्या भक्तांमध्ये शक्तीचा संचाल झालेला दिसतो. छत्रपती शिवाजी महाराजांच्या रुपाने आपण त्याचा प्रत्यय घेतला."

### शरद पवारांकडून योगींचा समाचार

समर्थ रामदास स्वामींच्या मार्गदर्शनामुळेच छत्रपती शिवाजी महाराजांना स्वराज्य निर्माण करता आले, असे वक्तव्य उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी केले आहे. त्याला प्रत्युत्तर देताना शरद पवार म्हणाले, काही लोक वेगळी भूमिका मांडण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र, खरा इतिहास काय आहे, तो जगाला माहिती आहे. आमच्या दृष्टीने राजमाता जिजाबाई याच छत्रपती शिवाजी महाराजांच्या मार्गदर्शक होत्या. जिजाबाईंनीच शिवाजी महाराजांच्या आयुष्याला दिशा दिली. पण, जिजाबाईंनी केलेले कर्तृत्व बाजूला सारून त्याचे श्रेय आणखी कोणाला देण्याची भूमिका काही लोक घेत आहेत, असा आरोप पवार यांनी केला.

### रोहित पवारांकडून निषेध

छत्रपती शिवाजी महाराजांना समर्थ रामदास स्वामी यांनी घडवलं, असं विधान उत्तर प्रदेशचे मुख्यंमंत्री योगी आदित्यनाथ यांनी आळंदी येथे केलं. या विधानाचा रोहित पवारांनी निषेध केला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांना राजमाता जिजाऊंऐवजी तिसऱ्याच व्यक्तीने घडवलं, असं कुणी म्हणत असेल, तर त्याचा आम्ही निषेध करतो. अजित पवार गट पूर्वी भाजप विरोधात असताना अशा विधानांचा निषेध करत होता. आज ते भाजपबरोबर गेले आहेत, त्यामुळे या विधानावर ते आता काय भूमिका घेणार? असा प्रश्न रोहित पवार यांनी उपस्थित केला.

## अभिषेक घोसाळकर हत्येप्रकरणी पाच जणांची गुन्हे शाखेकडून चौकशी

**मुंबई :** शिवसेनेच्या उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे माजी नगरसेवक अभिषेक विनोद घोसाळकर यांच्या हत्येप्रकरणी गुन्हे शाखेची चौकशी मालिका सुरूच असून, गेल्या दोन दिवसांत पाचजणांची पोलिसांनी चौकशी करून जबानी नोंदवून घेतली आहे. या जबानीतून अनेक धक्कादायक खुलासे करण्यात पोलिसांना आले आहे.

मॉरिस नोरोन्हा ऊर्फ मॉरिसभाईने आपल्या सहकाऱ्यासोबत अनेकदा विनोद घोसाळकर यांना गोळ्या घालून संपविणार असल्याचे म्हटल्याचे या जबानीतून उघडकीस आले आहे. त्यामुळे त्याच्यासोबत या कटात अन्य कोणाचा सहभाग होता का, त्यांनी मॉरिसला हत्येत मदत केली का याचा आता पोलिसांकडून तपास सुरू आहे. तीन दिवसांपूर्वीच मॉरिसने त्याच्याच कार्यालयात आलेल्या अभिषेक घोसाळकर यांची गोळ्या झाडून हत्या केली होती. या हत्येनंतर त्याने त्याच पिस्तूलमधून स्वतःवर गोळी झाडून आत्महत्या केली होती. याच गुन्ह्यांत मॉरिसचा बॉडीगार्ड अमेंदर मिश्रा याला गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी अटक केली असून, तो सध्या पोलीस कोठडीत आहे. अमेंदरच्या परवाना असलेल्या पिस्तूलमधून हा गुन्हा घडल्याने त्याच्यावर ही कारवाई करण्यात आली आहे. या अटकेनंतर मॉरिस आणि विनोद घोसाळकर यांच्याशी संबंधित पाच जणांची गेल्या दोन दिवसांपासून गुन्हे शाखेकडून चौकशी सुरू आहे. या चौकशीचा तपशील समजू शकला नाही; मात्र चौकशीतून हा पूर्वनियोजित कट असल्याचे उघडकीस आले आहे.

# भाजपच्या काळात १२१ नेत्यांवर ईडीची कारवाई

**पुणे :** भाजप सत्तेचा दुरुपयोग करत आहे. ईडीच्या माध्यमातून विरोधी पक्षाच्या नेत्यांवर कारवाई केली जात आहे. अगोदर लोकांना ईडी काय आहे हे माहिती नव्हते. भाजप सत्तेत आल्यानंतर आठ वर्षांत १२१ नेत्यांवर कारवाई करण्यात आली. यात एक मुख्यमंत्री, एक माजी मुख्यमंत्री, विरोधी पक्षांचे सरकार असणाऱ्या राज्यांतील १४ मंत्री, २४ खासदार, २१ आमदार, ७ माजी खासदारांचा समावेश आहे, याचा काय अर्थ काढायचा? असा सवाल शरद पवार यांनी उपस्थित केला आहे.

शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्ता मेळाव्यात रविवारी ते बोलत होते. पवार म्हणाले, "आज आपण वेगळ्या स्थितीतून जात आहोत. केंद्रातील सत्ता एका पक्षाच्या हातात आहे. उत्तरेकडील राज्यांचीही सत्ता भाजपच्या हातात आहे. त्यांची धोरणे सामाजिक ऐक्याला धक्का पोहोचवणारी आहेत. शनिवारी लोकसभेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन संपलं. पंतप्रधानांनी आपल्या भाषणात काहीही विधायक सांगितलं नाही. दोन दिवसांपूर्वी त्यांनी राज्यसभेत भाषण केले होते. त्यावेळीही त्यांनी इंदिरा गांधी, जवाहरलाल नेहरू यांच्यावरच भाष्य केलं. नेहरूंनी लोकशाही रुजवली, लोकशाहीचं शासन दिलं, त्यांच्यावर व्यक्तिगत हल्ले मोदी यांनी केले. मला समजत नाही की, त्याने काय साध्य होणार आहे. ज्यांनी देशाला दिशा दिली, देशासाठी कष्ट केले, त्यांच्यावर व्यक्तिगत हल्ले करणे हे शहाणपणाचं लक्षण नाही," असा हल्लाबोल शरद पवार यांनी केला.

### सत्तेच्या गैरवापराचा शरद पवार यांचा आरोप

#### निवडणूक आयोगाचा निकाल 'आश्चर्यकारक'



राष्ट्रवादी काँग्रेसबाबत निवडणूक आयोगाने दिलेल्या निकालामुळे पक्षाचे संस्थापक-अध्यक्ष शरद पवार बेचैन झाले आहेत. निवडणूक आयोगाचा निकाल हा 'आश्चर्यजनक' आहे. ज्यांनी पक्षाची स्थापना केली, त्यांच्याच हातातून पक्ष काढून दुसऱ्याच्या हातात दिला, असे पवार म्हणाले.

भाजप सत्तेचा गैरवापर करत असल्याचा आरोप करताना पवार म्हणाले, "आज भाजपच्या विचाराच्या विरोधात कोणी भूमिका घेत असेल तर सत्तेचा दुरुपयोग करून कारवाई केली जाते. अगोदर लोकांना ईडी हा शब्द माहीत देखील नव्हता. आता ईडी हा शब्द देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचला आहे. २००५ ते २०२३ या १८ वर्षांच्या कालावधीत ईडीने ६ हजार गुन्ह्यांची नोंद केली. चौकशी केल्यानंतर सत्यावर आधारित फक्त २५ खटले निघाले. त्या २५ खटल्यांपैकी फक्त दोघांना शिक्षा झाली. या गुन्ह्यांचा तपास करण्यासाठी ईडीने ४०४ कोटी रुपये खर्च केले. हे करत असताना ईडी कोणाच्या मागे लागली. गेल्या १८ वर्षांत १४७ नेत्यांची चौकशी झाली. त्यात ८५ टक्के नेते विरोधी पक्षाचे होते. भाजप सत्तेत आल्यानंतर आठ वर्षांत १२१ नेत्यांवर कारवाई करण्यात आली. यात एक मुख्यमंत्री, एक माजी मुख्यमंत्री, विरोधी पक्षाच्या सरकारमध्ये असलेले १४ मंत्री, २४ खासदार, २१ आमदार, ७ माजी खासदार यांचा समावेश होता," अशी आकडेवारी शरद पवार यांनी सादर केली. यामध्ये भाजपच्या एकाही नेत्याचे नाव नाही. भाजपच्या नेत्यांविरोधातील चौकशी थांबवण्यात आली. याचा अर्थ काय काढायचा? असा सवालही त्यांनी यावेळी केला.

# मानसिक, डायबिटीस, कर्करोग रुग्णांचे सर्वेक्षण

## ठिकठिकाणी सेंटर उभारणार; पालिका कॅन्सर प्रतिबंधक मॉडेल राबवणार

**मुंबई :** मानसिक रुग्ण, डायबिटीस रुग्ण, कर्करोग रुग्णांचा शोध घेत त्यांच्यावर वेळीच उपचार करणे शक्य व्हावे, यासाठी घरोघरी जाऊन सर्वेक्षण करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री आरोग्य आपल्या दारी योजने अंतर्गत हे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. आरोग्यसेविका आणि आशा वर्कर्सच्या माध्यमातून सर्वेक्षण होणार असून, चाचणीसाठी ठिकठिकाणी सेंटर सुरू करण्यात येणार आहे. तसेच कॅन्सरमुक्त मुंबईसाठी कॅन्सर प्रतिबंधक मॉडेल राबवण्यात येणार असल्याची माहिती पालिकेच्या आरोग्य विभागाकडून देण्यात आली.

मुंबईत हृदयरोग, मधुमेह आणि उच्च रक्तदाबाचे रुग्ण वाढले असून, मुंबई महापालिकेच्या वतीने २०२३ मध्ये घरोघरी जाऊन सर्वेक्षण करण्यात आले. या सर्वेक्षणात हृदयरोग, मधुमेह आणि उच्च रक्तदाबाचे रुग्ण मुंबईत वाढले असून, त्याबाबत योग्य ती काळजी घेऊन उपचार घ्यावे आणि या आजारांना प्रतिबंध करता येईल, याबाबत काळजी घेण्याची सूचना केल्या आहेत. मुंबईच्या धकाधकीच्या जीवनशैलीमुळे हृदयरोग व उच्च रक्तदाबाच्या आजाराचे प्रमाण वाढले असल्याचे समोर आले असून, मुंबईत होणाऱ्या एकूण मृत्यूंमध्ये तब्बल २५ टक्के मृत्यू हे हृदयरोग आणि उच्च रक्तदाबाचे असल्याचे समोर आले. या पार्श्वभूमीवर पालिकेनेही मुंबईत आरोग्य सेविका आणि आशा वर्कर्सच्या माध्यमातून सर्वेक्षणात १० लाख ४५ हजार मुंबईकरांची तपासणी केली. या तपासणीत ९ हजार ६०० जणांमध्ये म्हणजे ३५ टक्के मुंबईकरांचे उच्च रक्तदाबाचे निदान झाले होते. त्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येत आहेत. आता या सर्वेक्षणाबरोबर मनोरुग्ण आणि कर्करोगग्रस्तांचाही समावेश करण्यात आला आहे.

### 'आरोग्यम कुटुंबम' योजना राबवणार

महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून राबवण्यात येणाऱ्या 'आरोग्यम कुटुंबम' योजनेअंतर्गत आता मानसिक आरोग्य आणि कर्करोग प्रतिबंधक उपाययोजनांवर भर दिला जाणार आहे. सर्वेक्षणात हृदयरोग, मधुमेह, उच्च रक्तदाबासह मानसिक आरोग्यावर भर दिला जाणार आहे. कर्करोगामध्ये तोंड, स्तन आणि सर्व्हायकल कर्करोगाची प्राथमिक तपासणी केली जाणार आहे. यासाठी सरकारी आणि खासगी क्षेत्राची मदत घेतली जाणार आहे. त्याबरोबर ज्येष्ठ आणि इतर असाध्य आजार असलेल्यांसाठी घरच्या घरी रक्ताच्या चाचण्या करण्याची योजना तयार केली जाणार आहे. यात कोणत्या चाचण्या केल्या जाव्यात, यासाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेतले जाणार आहे.


## मल्टी कमॉडिटी एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड

एक्स्चेंज स्क्वेअर, सुरेन रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०९३, भारत. | CIN: L51909MH2002PLC135594 | E-mail id: info@mcxindia.com | www.mcxindia.com

MCX METAL & ENERGY Trade with Trust




### ३१ डिसेंबर २०२३ रोजी संपलेल्या तिमाही व नऊमाहीसाठी अलेखापरीक्षित आर्थिक निष्कर्षांचे सार

(₹ लाखांमध्ये, प्रत्येक समभागांच्या माहिती व्यतिरिक्त)

| तपशील | एकत्रित | | | | | | अलिप्त | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | संपलेली तिमाही ३१ डिसेंबर २०२३ अलेखापरीक्षित | संपलेली तिमाही ३० सप्टेंबर २०२३ अलेखापरीक्षित | संपलेली तिमाही ३१ डिसेंबर २०२२ अलेखापरीक्षित | संपलेली नऊमाही ३१ डिसेंबर २०२३ अलेखापरीक्षित | संपलेली नऊमाही ३१ डिसेंबर २०२२ अलेखापरीक्षित | संपलेले वर्ष ३१ मार्च २०२३ लेखापरीक्षित | संपलेली तिमाही ३१ डिसेंबर २०२३ अलेखापरीक्षित | संपलेली तिमाही ३० सप्टेंबर २०२३ अलेखापरीक्षित | संपलेली तिमाही ३१ डिसेंबर २०२२ अलेखापरीक्षित | संपलेली नऊमाही ३१ डिसेंबर २०२३ अलेखापरीक्षित | संपलेली नऊमाही ३० डिसेंबर २०२२ अलेखापरीक्षित | संपलेले वर्ष ३१ मार्च २०२३ लेखापरीक्षित |
| १. प्रचालनातून मिळालेले उत्पन्न | १९,१५३ | १६,५११ | १४,३५७ | ५०,२४१ | ३७,९७६ | ५१,३५१ | १६,३१२ | १३,९६४ | १२,३०३ | ४२,९९८ | ३३,४८१ | ४४,९२२ |
| २. कालावधीकरिता निव्वळ नफा (कर, अपवादात्मक बाबी आणि सहयोगीचा नफा शेअर/सामायिक करण्यापूर्वी) | (१,३२७) | (१,६४२) | ४,८४८ | (२९९) | १७,९२७ | १९,५५५ | (३,६२०) | (५१५) | ४,२८० | (१,१६४) | १५,०६५ | १७,१३५ |
| ३. कालावधीकरिता करापूर्वीचा निव्वळ नफा (अपवादात्मक बाबी आणि सहयोगीचा नफा शेअर/सामायिक केल्यानंतर) | (१,४४१) | (१,७४४) | ४,७७८ | (६४१) | १७,६५६ | १९,०५७ | (३,६२०) | (५१५) | ४,२८० | (१,१६४) | १५,०६५ | १७,१३५ |
| ४. कालावधीकरिता करानंतरचा निव्वळ नफा | (५३५) | (१,९०७) | ३,८७९ | (४७६) | १४,३५२ | १४,८९७ | (२,७१४) | (६७८) | ३,३८८ | (९९९) | ११,७६८ | १२,९८३ |
| ५. कालावधीकरिता एकूण व्यापक उत्पन्न [कालावधीकरिता सर्वसमावेशक नफा (करानंतर) आणि इतर व्यापक उत्पन्न (करानंतर)] | (५६१) | (२,१०४) | ३,८९० | (७२६) | १४,३७९ | १४,९९३ | (२,७४४) | (९२८) | ३,३६६ | (१,२५९) | ११,६५६ | १२,९१४ |
| ६. समभाग भांडवल (₹१०/- प्रति शेअर) | ५,०९९.८४ | ५,०९९.८४ | ५,०९९.८४ | ५,०९९.८४ | ५,०९९.८४ | ५,०९९.८४ | ५,०९९.८४ | ५,०९९.८४ | ५,०९९.८४ | ५,०९९.८४ | ५,०९९.८४ | ५,०९९.८४ |
| ७. राखीव (पुनर्मूल्यांकन निधी वगळून लेखापरीक्षित ताळेबंदात दर्शविल्यानुसार) | - | - | - | - | - | १,४२,८३० | - | - | - | - | - | १,५४,४७० |
| ८. प्रत्येक समभागाचे उत्पन्न (₹१०/- प्रत्येकी) | | | | | | | | | | | | |
| मूलभूत (₹) | (१.०५) | (३.७४) | ७.६२ | (०.९३) | २८.२० | २९.२७ | (५.३२) | (१.३३) | ६.६६ | (१.९६) | २३.१२ | २५.५१ |
| सौमिकृत (₹) | (१.०५) | (३.७४) | ७.६२ | (०.९३) | २८.२० | २९.२७ | (५.३२) | (१.३३) | ६.६६ | (१.९६) | २३.१२ | २५.५१ |

*अंतरिम कालावधीसाठी प्रति समभाग उत्पन्न हे वार्षिक नाही.

**सूचना:**

१) वरील तक्ता; सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट) रेग्युलेशन्स, २०१५ च्या नियम ३३ अंतर्गत बीएसईसोबत दाखल करण्यात आलेल्या त्रैमासिक वित्तीय निष्कर्षांचे सार आहे. त्रैमासिक वित्तीय निष्कर्षांचे पूर्ण स्वरूप बीएसईचे संकेतस्थळ **www.bseindia.com** आणि कंपनीचे संकेतस्थळ **www.mcxindia.com** वर उपलब्ध आहे.

२) दिनांक १० फेब्रुवारी २०२४ रोजी, वरील निष्कर्षांचे पुनरावलोकन लेखापरीक्षा समितीकडून केले गेले आहे आणि संचालक मंडळाच्या सभेत त्यांना मान्यता मिळाली आहे.

**मल्टी कमॉडिटी एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेडकरिता,**
स्वाक्षरी/-
**पी. एस. रेड्डी**
व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी

*स्थळ: मुंबई । दिनांक १० फेब्रुवारी २०२४*